# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०७.१०.२०२६ बुधवार**

**गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे अंतर्गत रेकॉर्डवरील एकूण ५६ आरोपींचे आदान—प्रदान हे दिनांक ०७.१०.२०२६ चे १०.०० वा. मा. अपर पोलीस आयुक्त कार्यालय (दक्षिण प्रभाग), नागपुर शहर येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत, याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. वसंत परेदशी (दक्षिण प्रभाग), मा. पोलीस उप आयुक्त, श्रीमती रश्मीता राव (परि. क्र. ०४), श्री. नित्यानंद झा (परि. क्र. ०५), मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. यशवंत नलावडे (एमआयडीसी विभाग), श्री. शिवाजी गायकवाड (सोनेगाव विभाग), श्री. महेश चव्हाण (सक्करदरा विभाग), श्री. नरेंद्र हिवरे (अजनी विभाग), श्री. रोहीत ओव्हाळ (कळमना व पारडी विभाग) हे उपस्थित होते. तसेच, एकूण १५ पोलीस ठाणे येथील आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील असे एकुण १५ अधिकारी व ३४ अंमलदार हजर होते. दिनांक १४.०७.२०२६ पासुन आजपावेतो एकूण ७८६ अटक आरोपीतांना आदान—प्रदान मोहीमेकरीता हजर करण्यात आलेले आहे.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.



**(कामगिरी)**

**कळमना बिट मार्शलची तत्परता :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०७.१०.२०२६ रोजी पोलीस ठाणे कळमना येथील बिट मार्शल कर्तव्यावर असलेले पोहवा. श्रीधर बरबटे व पोअं. रणजीत राठोड हे पोलीस ठाणे हद्दीत पठाण जिम, आदिवासी प्रकाश नगर परिसरात पेट्रोलिंग करित असता, त्यांना मागील बाजूस नंबरप्लेट नसलेली व पुढील बाजूस अर्धवट नंबरप्लेट असलेली एक ग्रे रंगाची ॲक्टीवा मोपेड दिसून आली. त्यांना नमुद वाहन संशयीत वाटल्याने त्यास थांबविल. वाहन चालकास वाहनाचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, वाहन चालकाने कोणतेही कागदपत्र सादर न करता, त्याने उडवा—उडवीची उत्तरे दिली. बिट मार्शल यांनी वाहनाचे इंजिन नंबर तथा नंबरप्लेट बाबत शहानिशा करून, वाहनाचे मुळ मालकाचा भ्रमणध्वनी क्रमांक प्राप्त केला. मुळ मालकासोबत नमुद वाहनाविषयी बोलनी केली असता, त्यांनी नमुद मोपेड क्र. एम.एच ४९ ए.व्ही ७८२५ असुन, ती चोरी झाल्याचे सांगून पोलीस ठाणे जरीपटका येथे वाहनचोरीचा गुन्हा दाखल केल्याचे सांगितले. यावरून नमुद वाहन चालकास वाहनासह ताब्यात घेवून, पुढील कार्यवाहीस्तव पोलीस ठाणे कळमना येथील तपास पथकाचे ताब्यात दिले. पुढील तपास सुरू आहे.

कळमना पोलीसांचे बिट मार्शल यांनी सतर्कता दाखवुन, संशयास्पद वाहनास ताब्यात घेवनु, वाहनाची बारकाईने तपासणी करून आणि वाहनाबाबत वेळीच संपूर्ण माहिती प्राप्त काढून जी कार्यतत्परता दाखविली, त्यामुळे एक वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

वरील कामगिरी वपोनि. प्रविण काळे यांचे मार्गदर्शनाखाली, कळमना बिटमार्शल पोहवा. श्रीधर बरबटे व पोअं. रणजीत राठोड यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बजाजनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.१०.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, फिर्यादी यांचा मोठा भाऊ नामे जोस जिजी जॉर्ज वय २६ वर्षे, रा. एम.आय.जी कॉलोनी, प्लॉट नं. ४०, फ्लॅट नं. २/३,२/४, मेडीकल चौक, ईमामवाडा, नागपूर हे त्यांचे ह्युंदाई आय १० कार क्र. एम.एच ४९ यु. ६६२७ ने त्यांचे बजाजनगर येथील फ्युएंन्ट कॅफेशॉप येथे जात होते. पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत कृपलाणी चौक क्रॅास करीत असतांना, अजनी चौक कडून सिताबर्डीकडे जाणाऱ्या ॲप्पल ट्रॅव्हल्स नावाचे बस क्र. एम.एच ४० सी.टी २५९९ चा चालक आरोपी नामे अनिस कदिरूद्दीन काजी, वय ३२ वर्षे, रा. पवनार, पो. ठाणे सेवाग्राम, तह. जि. वर्धा याने त्याचे ताब्यातील ट्रॅव्हल्सबस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, फिर्यादीचे भाऊ चालवित असलेल्या

कारला धडक दिल्याने, कारचालक गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

यापकरणी फिर्यादी जोएल जिजी जॉर्ज, वय २२ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे ट्रॅव्हल्स बसचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे तहसील :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०६.१०.२०२६ चे ०२.३० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गांजाखेत चौक येथे एक इसम हातात शस्त्र घेवून येणाऱ्या–जाणाऱ्या लोकांना शिवीगाळी करून धुमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा ईसम हातात तलवार घेवून धुमाकूळ घालतांना दिसून आला. त्याचे जवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. पोलीसांनी त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील तलवार काढून घेवून, त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अभिषेक दिलीप निखारे, वय ३० वर्षे रा. टिमकी, पिल्लु पांडू मंदीर जवळ, तहसील, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातून एक लोखंडी तलवार किंमती ३००/– रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार बाळगून धूमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. पंकज बोराटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे अंबाझरी</u> :–** फिर्यादी श्रीमती जमुना रूपेश चक्रधारी, वय ३० वर्षे, रा. दारूपाळा ग्राम, मुटपूरी, जि. छत्तीसगड, ह.मु. गोकुळपेठ, हनुमान मंदीरजवळ, ठवरे यांच्या बांधकाम साईडवर, नागपूर यांनी पोलीस ठाणे अंबाझरी येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे रूपेश सिताराम चक्रधारी, वय ३७ वर्ष हे दिनांक ०३.१०.२०२६ चे १०.०० पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरून बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **<u>वर्णन</u>** रंग–गोरा, चेहरा–गोल, उंची– ५ फुट ६ इंच, बांधा–मजबूत, केस–काळे, अंगात– निळी टी–शर्ट व भुरकट रंगाचा पॅन्ट व पायात चप्पल घातलेली आहे. भाषा– हिंदी बोलतात. ओळख– पाठीवर काळा डाग आहे. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंबाझरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**<u>२) पोलीस ठाणे अजनी</u> :–** फिर्यादी श्रीराम खिलावन साहू, वय ३२ वर्षे, रा. ग्राम गनीगवा, पोस्ट देवतालाब, ता. महुगंज, जि. लहौर (मध्य प्रदेश) ह.मु. विश्वकर्मा नगर, गल्ली नं. १०, मानकर यांचे घरी किरायाने, अजनी, नागपूर यांनी पोलीस ठाणे अजनी येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. सुनिता प्रमोद साहु, वय ३० वर्षे ह्या दिनांक ०६.०८.२०२६ चे ११.०० वा. पासुन राहते घरून कुठेतरी निघुन गेली असुन, बेपत्ता आहे. शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–लांबट, उंची– ५ फुट १ इंच, बांधा–मजबूत, केस–काळे लांब, डोळे– काळे, अंगात– गुलाबी रंगाची सलवार व कुर्ती घातलेली आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात. ओळख– हातावर इंग्रजीत 'प्रमोद' नाव गोंदलेले आहे. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



रूपेश



सुनिता

स्वा/—
( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

## -प्रेसनोट-

**श्री सुधाकर व्यंकटेश्वरराव यार्लगड्डा, सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश हे विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नागपूर विभाग, नागपूर येथे अध्यक्ष पदावर रूजु झाल्याबाबत.**

श्री सुधाकर व्यंकटेश्वरराव यार्लगड्डा (सेवानिवृत्त प्रमुखजिल्हा व सत्र न्यायाधिश) हयांची महाराष्ट्र शासन राजपत्र, गृहविभाग दिनांक २५/०८/२०२६ अन्वये अध्यक्ष, विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नागपूर म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नागपूर येथे दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी अध्यक्ष पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे.

श्री सुधाकर व्यंकटेश्वरराव यार्लगड्डा, अध्यक्ष हे दिनांक १५/११/१९९५ पासुन न्यायिक सेवेत कार्यरत असुन ते प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अमरावती येथुन दिनांक २८/०२/२०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा न्यायिक सेवेत प्रदिर्घ अनुभव असून त्यांनी आपल्या न्यायिक सेवेच्या कार्यकाळात बाल न्याय मंडळ (Juvenile Justice Board) येथे प्रमुख न्यायाधिश, विशेष न्यायाधिश-सी.बी.आय. न्यायालय तसेच न्यायिक प्रशिक्षण केंद्र, उत्थान येथे सहसंचालक (Joint Director) म्हणुन सुध्दा न्यायिक कामकाज पाहिलेले आहे. त्याच प्रमाणे आपल्या न्यायिक सेवेच्या कार्यकाळात ते श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी येथे संस्थानाचे अध्यक्ष राहीलेले आहेत.

नगपूर शहर व नागपूर ग्रामीण तसेच वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्हयातील पोलीस शिपाई ते वरीष्ठ पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी यांचे विरुध्द नागरिकांच्या तक्रारी असल्यास न्याय मिळावा यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशान्वये महाराष्ट्र शासनाने, शासन राजपत्र, असाधारण भाग-चार-ब, गृहविभाग क्रं.२९५, दिनांक १०/०८/२०१८ अन्वये राज्यात ०६ ठिकाणी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे. (नागपूर, अमरावती, नाशिक, पूणे, छत्रपती संभाजीनगर व कोकण परिक्षेत्र)

नागपूर विभागात जून-२०२२ पासून विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण कार्यरत असून श्री सुरेंद्र आर. शर्मा हयांचा अध्यक्ष पदाचा कार्यकाळ जून-२०२५ मध्ये संपुष्टात आल्याने प्राधिकरणात अध्यक्षांचे पद रिक्त होते व या कार्यकाळात श्री अरविंद डी.दुबे, सदस्य यांचे कडे अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता.

विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणा मध्ये त्रीसदस्यीय पीठ असून अध्यक्ष पदी श्री सु.वें.यार्लगड्डा असून सदस्यपदी अनुक्रमे श्री दिलीप कृ.झळके (सेवानिवृत्त भा.पो.से./Retd.I.P.S) आणि श्री अरविंद डी.दुबे (नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती) असल्याने नागपूर विभागातील नागरीकांना त्यांच्या पोलीसां विरुध्द असलेल्या तक्रारींवर न्यायनिवाडा करण्यास बळ मिळणार आहे.

1/10/26
(राजीव दळवी)
प्रभारी प्रशासकीय अधिकारी
विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नागपूर विभाग,
नागपूर

प्रति,